# प्रकरण - चौथे

# दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनाचा महाराष्ट्र शासनावर आणि शेतकऱ्यांवर झालेला परिणाम

## प्रकरण - चौथे

# ''दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनाचा महाराष्ट्र शासनावर आणि शेतकऱ्यांवर झालेला परिणाम''

**प्रस्तावना :**

दक्षिण महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आंदोलने गेल्या चार-पाच वर्षापासून होत आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाची तीव्रता गेल्या दोन-तीन वर्षापासून वाढत आहे. तसेच ऊस पीकास उत्पादन खर्चावर आधारित दर मिळावा या मागणीसाठी दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलने केली आहेत. या दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आंदोलनापूर्वी प्रतिटन ५०० ते ६०० रूपये ऊसास पहिला हप्ता मिळत होता. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या ऊस आंदोलनानंतर शेतकऱ्यांना वाढीव ऊस दर मिळत गेला. तो म्हणजे २००६-०७ च्या गळीत हंगामास १२८०/- रूपये दर प्रतिटन ठरविण्यात आला. १२८०/- रूपये दरापैकी ९००/- रूपयेचा ऊसास पहिला हप्ता शेतकऱ्यांना मिळाला आहे. पण ऊस बिलाचा दुसरा हप्ता ३८०/- रूपये अजूनही शेतकऱ्यांना मिळाला नाही. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलने केली. प्रथमता ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाची दखल सहकारी साखर कारखाने आणि महाराष्ट्र शासन यांनी घेतली नाही. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन करताना हिंसक मार्गाचा अवलंब करण्यास प्रारंभ केला. हिंसक मार्ग वापरल्यामुळे शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाकडे लक्ष दिले. तसेच दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी परराज्यात ऊस पाठविण्यास तयार झाले होते. कारण शेजारी असणाऱ्या कर्नाटक राज्यात १५००/- रूपये प्रतिटन ऊसास दर मिळतो आहे. हे शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांस माहिती करून दिले होते. परराज्यात ऊस पाठवणे हा निर्णय ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी व शेतकरी संघटनांनी घेतला होता. परिणामी या शेतकऱ्यांच्या निर्णयावर शासनाने त्यांची अडवणूक केली.

परराज्यात ऊस पाठविण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांतील असंतोष वाढतच गेला. त्यांचे आंदेलन जास्तच चिघळत गेले. व या आंदोलनाचे विविध परिणाम शासनावर झाले.

दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाबरोबर दुध उत्पादक शेतकऱ्यांचीही आंदोलने झाली आहेत. दक्षिण महाराष्ट्रात दुग्धोत्पादक शेतकऱ्यांची 'दुध बंद आंदोलने' २००६ पासून होत आहेत. दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना दुधाचे दर योग्य मिळत नव्हते. म्हणून दुध दर उत्पादन खर्चावर आधारित मिळावा या मागणीसाठी दध बंद आंदोलने केली आहेत. म्हैशीच्या दुधास २४ रूपये प्रतिलिटर तर गायीच्या दुधास २० रूपये प्रतिलिटर दर अशी मागणी दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केली होती. दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केलेले 'दुध बंद आंदोलन' शेतकरी संघटनेच्या माध्यमातून केले होते. शेतकरी संघटनेने दुध उत्पादन खर्चावर आधारित दर मिळविण्यासाठी प्रथम दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना संघटीत केले आणि त्यानंतर दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी विविध आंदोलने केली. या दुध बंद आंदोलनापूर्वी म्हैशीच्या दुधास १०.०० फॅटसाठी २० रूपये दर तर गाईच्या दुधास १२ रूपये दर मिळत होता. दुध बंद आंदोलनानंतरच्या दुध दरात वाढ झाल्याचे दिसून येते. हे दर दोन रूपयांनी वाढले. याची विविध कारणे आहेत. ती म्हणजे सहकारी दुध संघाकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात होती. तसेच दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केलेले अर्ज, तक्रारी यांच्याकडे दुर्लक्ष करत होते. त्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांनी हिंसक मार्ग वापरले. त्यामध्ये टँकर फोडणे, वाहनांची मोडतोड करण्यात आली होती. याचा परिणाम शासनावर झाला. आणि दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुध दरवाढ झाली होती. या सर्व बाबींचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणात करण्यात आला आहे.

**शेतकरी संघटनेने केलेल्या ऊस आंदोलनाचा शासनावर झालेला परिणाम :**

दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाचे शासनावर विविध परिणाम झाले आहेत. दक्षिण महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनापूर्वी सहकारी साखर कारखाने ऊसास प्रतिटन ५०० ते ६०० रूपये पर्यंत दर

देत होते. मात्र ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हा दर परवडत नव्हता. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संघटीत होवून संघटनेच्या माध्यमातून ऊस आंदोलने उभारली होती. या ऊस आंदोलनामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव दर मिळाला आहे. म्हणजे २००६-०७ च्या गळीत हंगामास पहिला हप्ता प्रतिटन ९००/- रूपये मिळाला. आंदोलनानंतर प्रतिटन ९००/- रूपये म्हणजे प्रतिटन १०० ते २०० रूपयांनी वाढीव दर मिळाला.

दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या ऊस आंदोलनाची तीव्रता वाढण्याचे कारण म्हणजे साखर कारखानदार हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस गाळपास आणल्यानंतर कारखान्यांचे वजनकाटे दोषरहित ठेवून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक केली जात होती. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलने उभारली होती. या आंदोलनाकडे साखर कारखानदार आणि शासनाने प्रथमता पूर्णपणे दुर्लक्ष केले. शासन ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींची काही प्रमाणात दखल घेत होते. त्यामध्ये तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आश्वासन दिले होते की, ऊसाचा दुसरा हप्ता देण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी जून २००७ च्या पहिल्या आठवड्यात बैठक घेतली जाईल[१] असे आश्वासन दिले होते. तसेच कोल्हापूर जिल्ह्याचे तत्कालिन पालकमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी जबाबदारी स्विकारली नाही, त्यावेळी ते म्हणाले की, ऊसाचा ३८०/- रूपयांचा दुसरा हप्ता देणे ही सरकारची जबाबदारी नाही. ऊस दरासाठी झालेल्या करारात शासनाचा हस्तक्षेप नव्हता.''[२] असे म्हणून तत्कालिन पालकमंत्र्यांनी आपली जबाबदारी झटकून टाकल्याचे दिसून येते. तसेच तत्कालिन सहकारमंत्री पतंगराव कदम म्हणाले की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन व ऊस दर वाढवून मिळणे हा प्रश्न कोल्हापूर जिल्ह्यापूरता मर्यादित आहे'.[३] यावरून असे दिसून येते की, 'ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनाचे धोरण फारसे अनुकूल राहिले नाही. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी अर्ज, विनंती, तक्रारी, निवेदने याप्रकारच्या अहिंसक मार्गानी आंदोलन करण्याचे बंद केले. आणि हिंसक मार्गानी आंदोलने ऊस

उत्पादक शेतकऱ्यांनी उभारली होती. त्यातच परराज्यात ऊसास जादा भाव मिळत. असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस परराज्यात पाठविण्याचा निर्णय घेतला होता. मात्र अशा परिस्थितीत शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अडवणूक केली. म्हणजे असे म्हणता येते की, भारतीय राज्यघटनेत व्यक्ती स्वातंत्र्य दिले असताना सुद्धा मुलभूत हक्कांवर शासनाने गदा आणल्याचे दिसून येते. या सर्व बाबींमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन जास्तच चिघळत गेले. तसेच शासनाचे धोरण फारसे अनुकूल राहिले नव्हते. अशा परिस्थितीमध्ये ऊस उत्पादन खर्च वाढत गेला आणि ऊसासाठी लागणाऱ्या खतांच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली होती. मजूरांनी मजूरीचे दर वाढवले होते. ऊस लागवड, बेणे यांचा खर्च वाढत गेला होता. तर दुसरीकडे शासनाने अशा परिस्थितीत विजेचे भारनियमन वाढवले होते. त्यामुळे ऊस उत्पादकांना शेतीस पाणीपुरवठा करणेही अशक्य झाले होते. याचा परिणाम म्हणजे आंदोलनाची तीव्रता वाढत गेली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाची तीव्रता वाढत जाण्याचे दुसरे कारण म्हणजे २००६-०७ च्या ऊस गळीत हंगामासाठी केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठा मंत्रालयाने ऊसाची किमान वैधानिक किंमत ९% उताऱ्यासाठी ८०२.५० पैसे एवढी रक्कम निश्चित केली होती.[४] या निर्णयावर तत्कालिन सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम राज्यशासनाची भूमिका व्यक्त करताना म्हणाले की, "ऊस दराच्या प्रश्नाबाबत येत्या शुक्रवारी दि. ५ ऑक्टोबर २००७ रोजी मंत्रीमंडळाची उपसमिती, शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी व अधिकारी यांची संयुक्त बैठक मुंबई येथे आयोजित केली जाईल. व या बैठकीत ऊस दराबाबत तोडगा काढण्यात येईल. आणि कोल्हापूर जिल्ह्यातील जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना व दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना यांच्या सर्वसाधारण वार्षिक सभेवेळी झालेल्या प्रकाराबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश सहकार आयुक्तांना देण्यात आले आहेत. वास्तविक साखर कारखान्यांचे खरे मालक हे सभासद शेतकरीच आहेत. त्यामुळे ऊस दराबाबत अन्य मार्गाचा अवलंब करणे योग्य नाही. साखर कारखाना व्यवस्थापन जर जाणिवपूर्वक ऊसदर देण्याबात टाळाटाळ करीत असेल, तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संबंधित

साखर कारखान्याविरोधात पुराव्यानिशी तक्रारी कराव्यात. या तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संपूर्ण संचालक मंडळ बरखास्त केले जाईल". तसेच "शासनाकडून साखर कारखान्यांना थकहमी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. मात्र सांगली जिल्ह्यातील सोनहिरा सहकारी साखर कारखान्यासह महाराष्ट्रातील १६ साखर कारखान्यांना थकहमीची गरज नाही. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतीच्या पाण्यासाठी आकारण्यात येणारे वीजबिल परवडणारे नाही. सरकारी पाणी योजनेसाठी जे दर आहेत तेवढीच आकारणी करावी."[५] अशा प्रकारे शासनाचे धोरण राहिल्याचे दिसून येते.

दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान वैधानिक किंमत देण्याचे मान्य केले. तसेच शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रतिटन ९००/- रूपये पहिला हप्ता देण्यात आला. आणि कोल्हापूर येथील छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना, कागल या कारखान्याने ऊसाचा दुसरा ३८०/- रूपये दिला आहे. तर दक्षिण महाराष्ट्रातील अन्य काही सहकारी साखर कारखान्यांनी ऊसाचा दुसरा हप्ता कमी-अधिक प्रमाणात दिला आहे. या साखर कारखानदारांच्या मते, 'बाजारपेठेत साखरेचे दर कमी झाले आहेत. त्यामुळे ऊस बिलाच्या ३८०/- रूपयांच्या दुसऱ्या हप्त्यातील रक्कम केवळ ५० ते १२५ रूपयेपर्यंत दिली आहे. त्यामध्ये दुधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखाना, बिद्री या कारखान्याने ५०/- रूपये तर तात्यासाहेब कोरे सहकारी साखर कारखाना, वारणानगर या साखर कारखान्याने १२५/- रूपये असे ऊस बिलाचे दुसरे हप्ते देण्यात आले आहेत.'[६] त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस बिलाचे दुसरे हप्ते कमी-अधिक प्रमाणात साखर कारखान्यांनी दिले होते.

दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारकान्यांना शासनाने किमान वैधानिक किंमत देणे बंधनकारक केले होते. असे शासनाने बंधन घालूनही दक्षिण महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांनी किमान वैधानिक किंमत दिली नाही. यावर शासनाचे पुढचे धोरण असे राहिले की, शासनाने ठरवून दिलेली किमान वैधानिक किंमत न देणाऱ्या

साखर कारखान्यांना नोटीसा पाठविल्या. तरीही साखर कारखानदारांनी या नोटीसाकडे व किमान वैधानिक किंमतीकडे दुर्लक्ष केले. यावर शासनाने साखर कारखान्यांवर जप्तीची कारवाई करण्यास सुरूवात केली होती. त्यामध्ये खालील साखर कारखान्यांचा समावेश होता.

**कोल्हापूर जिल्ह्यातील जप्तीची कारवाई झालेले साखर कारखाने -**

१) उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखाना, सोनवडे, (शाहूवाडी).

२) दौलत सहकारी साखर कारखाना, चंदगड.

**सांगली जिल्ह्यातील जप्तीची कारवाई झालेले साखर कारखाने -**

१) वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली.

२) माणगंगा सहकारी साखर कारखाना, आटपाडी.

३) महाकाली सहकारी साखर कारखाना, कवठेमहांकाळ.

या साखर कारखान्यांचा समावेश होता.[७] या प्रकारच्या शासनाच्या धोरणामुळे 'उदयसिंगराव गायकवाड सहकारी साखर कारखाना, सोनवडे' या कारखान्याचे ३६ लाख रूपये जमा केले. मात्र अजूनही या साखर कारखान्याकडून ७६ लाख रूपये येणे बाकी आहे. तसेच दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, चंदगड या कारखान्याने ३ कोटी ७५ लाख रूपये जमा केले. मात्र अद्यापही या साखर कारखान्याकडे २ कोटी २५ लाख रूपये रक्कम येणे आहे. तसेच सहकारी क्षेत्रात सर्वात मोठा वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली या साखर कारखान्याचे ५ कोटी ७० लाख रूपये जमा केले नाहीत. माणगंगा सहकारी साखर कारखान्याने (आटपाडी) १ कोटी ७५ लाख रूपये, महांकाली सहकारी साखर कारखाना, कवठेमहांकाळ या कारखान्याने १ कोटी ५० लाख रूपये जमा केले नाहीत.[८] या किमान वैधानिक किंमतीच्या रक्कमा साखर कारखान्यांनी जमा करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. अशा प्रकारची धोरणे शासनाची राहिल्याचे दिसून येत आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांना शासनाने अबकारी रक्कम म्हणून ३०० कोटी रूपये देण्याची घोषणा केली होती. यामध्ये 'कोल्हापूर आणि

सांगली' जिल्ह्यांतील ३५ साखर कारखान्यांना अबकारी करापोटी ३०० कोटी रूपये मिळणार आहेत. या रक्कमेतून किमान वैधानिक किंमत देण्याचा शासनाचा आग्रह राहिल्याचे दिसून येते. दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांना २००६-०७ च्या गळीत हंगामासाठी शासनाकडून मिळणारी रक्कम पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ४.१**

**कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांना २००६-०७ च्या गळीत हंगामासाठी शासनाकडून मिळालेली रक्कम**

| अ.क्र. | सहकारी साखर कारखाने | रक्कम |
|---|---|---|
| १. | छत्रपती शाहू स. सा. कारखाना, कागल | ८२१.८६ लाख |
| २. | सदाशिवराव मंडलिक स. सा. कारखाना, हमिदवाडा | ४५८.३० लाख |
| ३. | कुंभी कासारी स. सा. कारखाना, कुडित्रे (करवीर) | ४४९.४७ लाख |
| ४. | दुधगंगा वेदगंगा स. सा. कारखाना, बिद्री (कागल) | ५६९.८३ लाख |
| ५. | जवाहर शेतकरी स. सा. कारखाना, हुपरी | ९३५.६२ लाख |
| ६. | देशभक्त रत्नाप्पा कुंभार पंचगंगा स. सा. कारखाना, इचलकरंजी | ५१५.०९ लाख |
| ७. | दौलत स. सा. कारखाना, हलकर्णी (चंदगड) | ४१८.७१ लाख |
| ८. | गडहिंग्लज तालुका स. सा. कारखाना, हरळी | ३१६.२३ लाख |
| ९. | श्री दत्त शेतकरी स. सा. कारखाना, शिरोळ | ८६५.७४ लाख |
| १०. | तात्यासाहेब कोरे स. सा. कारखाना, वारणानगर | १०४६.३८ लाख |
| ११. | छत्रपती राजाराम स. सा. कारखाना, कसबा बावडा | ३०५.०८ लाख |
| १२. | शरद शेतकरी स. सा. कारखाना, नरंदे | ३४५.८० लाख |
| १३. | दत्त स. सा. कारखाना, आसुर्ले-पोर्ले | ९७.३७ लाख |
| १४. | भोगावती स. सा. कारखाना, परिते | ४६९.५१ लाख |
| १५. | उदयसिंगराव गायकवाड स. सा. कारखाना, सोनवडे | १२९.१७ लाख |

**तक्ता क्र. ४.२**

**सांगली जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांना २००६-०७ च्या गळीत हंगामासाठी शासनाकडून मिळालेली रक्कम**

| अ.क्र. | सहकारी साखर कारखाने | रक्कम |
|---|---|---|
| १. | राजारामबापू स. सा. कारखाना, वाळवा | ६७७.१९ लाख |
| २. | हुतात्मा किसन अहिर स. सा. कारखाना, वाळवा | ४९७.७६ लाख |
| ३. | महाकाली स. सा. कारखाना, कवठे महांकाळ | ३३७.४८ लाख |
| ४. | डोंगराई सागरेश्वर स. सा. कारखाना, कडेगांव | २०३.१० लाख |
| ५. | राजेविजयसिंह स. सा. कारखाना, डफळे, जत | २७९.३३ लाख |
| ६. | माणगंगा स. सा. कारखाना, आटपाडी | २८८.६५ लाख |
| ७. | निनाईदेवी स. सा. कारखाना, कोकरूड | ५९.८९ लाख |
| ८. | तासगांव तालुका स. सा. कारखाना, तुरची, तासगांव | २४२.१५ लाख |
| ९. | वसंतदादा शेतकरी स. सा. कारखाना, सांगली | ६२६.१५ लाख |
| १०. | विश्वासराव नाईक स. सा. कारखाना, शिराळा | ३६१.९४ लाख |
| ११. | यशवंत स. सा. कारखाना, नागेवाडी | १५६.४८ लाख |
| १२. | क्रांती स. सा. कारखाना, पलूस | ३६८.८६ लाख |
| १३. | सर्वोदय स. सा. कारखाना, वाळवा | २६२.३३ लाख |
| १४. | मोहनराव शिंदे स. सा. कारखाना, मिरज | ४३७.३१ लाख |

वरील प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांना ही रक्कम कर्ज म्हणून पुरविली जाणार आहे. ही रक्कम राज्य बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जपुरवठा केला जाईल.[९] शासनाने दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांना या रक्कमा देवूनही 'किमान वैधानिक किंमत' देण्यासाठी प्रतिटना मागे ५० ते १७५ रूपये कमी पडत होते. त्याची उभारणी साखर कारखान्यांना स्वनिधीतून करावी लागणार होती.[१०] तसेच शासनाने सहकारी साखर कारखान्यांना पॅकेजेस आणि अबकारी कराच्या रक्कमा देवूनही साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊस बिलाच्या दुसऱ्या हप्त्याच्या रक्कमा बुडविल्या आहेत. त्या रक्कमा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाल्या नाहीत. त्या रक्कमा पुढील प्रमाणे आहेत.

## तक्ता क्र. ४.३

## कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस बिलातील दुसऱ्या हप्त्याची रक्कम बुडविणारे सहकारी साखर कारखाने ( २००६-०७ )

| अ.क्र. | साखर कारखाने | रक्कम ( कोटी ) |
|---|---|---|
| १. | सदाशिवराव मंडलिक स. सा. कारखाना, हमिदवाडा | १९,७९,८०,०००/- |
| २. | कुंभी कासारी स. सा. कारखाना, कुडित्रे (करवीर) | १९,५३,२०,०००/- |
| ३. | दुधगंगा वेदगंगा स. सा. कारखाना, बिद्री (कागल) | २४,४३,४०,०००/- |
| ४. | जवाहर शेतकरी स. सा. कारखाना, हुपरी | ४०,८१,२०,०००/- |
| ५. | देशभक्त रत्नाप्पा कुंभार पंचगंगा स. सा. कारखाना, इचलकरंजी | २४,४३,३४,०००/- |
| ६. | दौलत स. सा. कारखाना, हलकर्णी (चंदगड) | १९,७८,४०,०००/- |
| ७. | गडहिंग्लज तालुका स. सा. कारखाना, हरळी | १४,३२,६०,०००/- |
| ८. | श्री दत्त शेतकरी स. सा. कारखाना, शिरोळ | ३८,९५,००,०००/- |
| ९. | तात्यासाहेब कोरे स. सा. कारखाना, वारणानगर | ४७,७२,८०,०००/- |
| १०. | छत्रपती राजाराम स. सा. कारखाना, कसबा बावडा | १४,२५,००,०००/- |
| ११. | शरद शेतकरी स. सा. कारखाना, नरंदे | १५,७७,००,०००/- |
| १२. | दत्त स. सा. कारखाना, आसुर्ले-पोर्ले | ४९,७८,०००/- |
| १३. | भोगावती स. सा. कारखाना, परिते | २०,७४,८०,०००/- |
| १४. | उदयसिंगराव गायकवाड स. सा. कारखाना, सोनवडे | ७४,४८,००,०००/- |
| १५. | आजरा शेतकरी स. सा. कारखाना, शेतगवसे | ११,९१,२०,०००/- |
| १६. | डॉ. डी. वाय. पाटील स. सा. कारखाना, वेफरफ | १३,४९,००,०००/- |
| १७. | इंदिरा गांधी स. सा. कारखाना, तांबाळे | ८८,९२,०००/- |

याप्रमाणे साखर कारखान्यांनी किमान वैधानिक किंमतीच्या रक्कमा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिल्या नाहीत.[११] शासनाने सहकारी साखर कारखान्यांना वरील रक्कमा किमान वैधानिक किंमत देण्यासाठी पुरविल्या आहेत. मात्र त्या रक्कमा कारखान्यांनी अदा केल्या नाहीत. अशा प्रकारे आंदोलनाचे शासनावर परिणाम झाल्याचे दिसून येतात. या बरोबर दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ऊस आंदोलनापूर्वी दिलेला ऊस दर पाहणे आवश्यक ठरते. तो ऊस दर पुढीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ४.४

## ऊस आंदोलनापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांनी ऊसाला दिलेला अंतिम दर ( सन २००३ ते २००७ )

**कोल्हापूर जिल्हा -**

| अ.क्र. | सहकारी साखर कारखाने | उसास दिलेला दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| १. | आजरा तालुका स. सा. कारखाना, शेतगवसे | -- | -- | -- | -- |
| २. | छत्रपती शाहू स. सा. कारखाना, कागल | १०२१ | १४०० | १७०० | ११५०* |
| ३. | सदाशिवराव मंडलिक स. सा. कारखाना, हमिदवाडा | ९५४ | १३०० | १४५०* | -- |
| ४. | कुंभी कासारी स. सा. कारखाना, कुडित्रे (करवीर) | ९२० | १२७५ | १४०५ | -- |
| ५. | दुधगंगा वेदगंगा स. सा. कारखाना, बिद्री (कागल) | ९१३ | ११०० | १३००* | ९५० |
| ६. | जवाहर शेतकरी स. सा. कारखाना, हुपरी | ८८५ | १२२५ | १२५०* | ९००* |
| ७. | देशभक्त रत्नाप्पा कुंभार पंचगंगा स. सा. कारखाना, इचलकरंजी | ८०१ | १००१ | १३००* | ९००* |
| ८. | दौलत स. सा. कारखाना, हलकर्णी (चंदगड) | -- | -- | -- | -- |
| ९. | गडहिंग्लज तालुका स. सा. कारखाना, हरळी | ८७० | १०२५ | १३००* | ९००* |
| १०. | श्री दत्त शेतकरी स. सा. कारखाना, शिरोळ | -- | ११७६ | १४३५ | ९०० |
| ११. | तात्यासाहेब कोरे स. सा. कारखाना, वारणानगर | ९३५ | १२६० | १५०० | -- |
| १२. | छत्रपती राजाराम स. सा. कारखाना, कसबा बावडा | ८२५ | ११०० | १३२५ | ९०० |
| १३. | शरद शेतकरी स. सा. कारखाना, नरंदे | ९०० | १२५० | १३७५* | -- |
| १४. | दत्त स. सा. कारखाना, आसुर्ले-पोर्ले | -- | -- | -- | -- |
| १५. | भोगावती स. सा. कारखाना, परिते | ९०७ | ११०० | १३०० | -- |
| १६. | उदयसिंगराव गायकवाड स. सा. कारखाना, सोनवडे | ८१० | १०११ | १२०० | ९०० |
| १७. | डॉ. डी. वाय. पाटील स. सा. कारखाना, वेफरफ | ८२१ | १०५४ | १२०० | ९०० |
| १८. | इंदिरा गांधी महिला स. सा. कारखाना, तांबाळे | -- | -- | १३०० | ९५० |
| १९. | गुरूदत्त स. सा. कारखाना, टाकळीवाडी | ९२५ | १२००* | १३००* | ९००* |

## तक्ता क्र. ४.५

### सांगली जिल्हा -

| अ.क्र. | सहकारी साखर कारखाने | उसास दिलेला दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| १. | डोंगराई सागरेश्वर स. सा. कारखाना, कडेपूर | -- | -- | -- | -- |
| २. | हुतात्मा किसन अहिर स. सा. कारखाना, वाळवा | ९६६ | १४१८ | १३५०* | १०००* |
| ३. | राजेविजयसिंह स. सा. कारखाना, डफळे, जत | -- | -- | -- | -- |
| ४. | महांकाली स. सा. कारखाना, कवठे महांकाळ | ८०० | -- | १२००* | ८५०* |
| ५. | माणगंगा स. सा. कारखाना, आटपाडी | -- | -- | १२०० | ८५० |
| ६. | निनाईदेवी स. सा. कारखाना, कोकरूड | ७७४ | -- | १२०० | -- |
| ७. | राजारामबापू पाटील स. सा. कारखाना, साखराळे | ९५० | १४०४ | १४८०* | ११००* |
| ८. | सोनहिरा स. सा. कारखाना, वांगी | ८०० | १२७५ | १३०० | ९०० |
| ९. | तासगांव तालुका स. सा. कारखाना, तुरची | -- | -- | १३०० | १००० |
| १०. | वसंतदादा शेतकरी स. सा. कारखाना, सांगली | ७५० | -- | १३००* | ९०० |
| ११. | विश्वासराव नाईक स. सा. कारखाना, चिखली | ८५७ | १२०१* | १४०० | ९७५* |
| १२. | यशवंत स. सा. करखाना, नागेवाडी | -- | -- | -- | -- |
| १३. | क्रांती स. सा. कारखाना, कुंडल (पलूस) | ८३३ | ११५० | १३००* | ९००* |
| १४. | सर्वोदय स. सा. कारखाना, कारंदवाडी | -- | १०८३ | १३०१ | ९०० |
| १५. | मोहनराव शिंदे स. सा. कारखाना, मिरज | ८०० | -- | १३०० | ९००* |

(प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर रेकॉर्ड २००३ ते २००८)[१२]

या प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी आंदोलनापूर्वी ऊस दर दिला आहे. तसेच या बरोबर शेतकऱ्यांच्या ऊस आंदोलनानंतर साखर कारखान्यांनी दिलेले ऊस दर पाहणे उचीत ठरते. तो ऊस दर पुढील प्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ४.६

## ऊस आंदोलनानंतर दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ऊसाला दिलेला अंतिम दर ( सन २००७-०८ )

### कोल्हापूर जिल्हा -

| अ.क्र. | सहकारी साखर कारखाने | उसास दिलेला दर २००७-०८ |
|---|---|---|
| १. | आजरा तालुका स. सा. कारखाना, शेतगवसे | ८००* |
| २. | छत्रपती शाहू स. सा. कारखाना, कागल | ९६५* |
| ३. | सदाशिवराव मंडलिक स. सा. कारखाना, हमिदवाडा | ९५१* |
| ४. | कुंभी कासारी स. सा. कारखाना, कुडित्रे (करवीर) | ९४०* |
| ५. | दुधगंगा वेदगंगा स. सा. कारखाना, बिद्री (कागल) | ९४०* |
| ६. | जवाहर शेतकरी स. सा. कारखाना, हुपरी | ९००* |
| ७. | देशभक्त रत्नाप्पा कुंभार पंचगंगा स. सा. कारखाना, इचलकरंजी | ८२३* |
| ८. | दौलत स. सा. कारखाना, हलकर्णी (चंदगड) | ८१५* |
| ९. | गडहिंग्लज तालुका स. सा. कारखाना, हरळी | ८७२.८०* |
| १०. | श्री दत्त शेतकरी स. सा. कारखाना, शिरोळ | ९६५* |
| ११. | तात्यासाहेब कोरे स. सा. कारखाना, वारणानगर | ९००* |
| १२. | छत्रपती राजाराम स. सा. कारखाना, कसबा बावडा | ८२०* |
| १३. | शरद शेतकरी स. सा. कारखाना, नरंदे | ८५९* |
| १४. | दत्त स. सा. कारखाना, आसुर्ले-पोर्ले | ९००* |
| १५. | भोगावती स. सा. कारखाना, परिते | ९२८.८०* |
| १६. | उदयसिंगराव गायकवाड स. सा. कारखाना, सोनवडे | ६५०* |
| १७. | डॉ. डी. वाय. पाटील स. सा. कारखाना, वेफरफ | ७२०* |
| १८. | इंदिरा गांधी महिला स. सा. कारखाना, तांबाळे | ६५०* |
| १९. | गुरूदत्त स. सा. कारखाना, टाकळीवाडी | ९००* |

**तक्ता क्र. ४.७**

**सांगली जिल्हा -**

| अ.क्र. | सहकारी साखर कारखाने | उसास दिलेला दर २००७-०८ |
|---|---|---|
| १. | डोंगराई सागरेश्वर स. सा. कारखाना, कडेपूर | ६५७* |
| २. | हुतात्मा किसन अहिर स. सा. कारखाना, वाळवा | ९५०* |
| ३. | राजेविजयसिंह स. सा. कारखाना, डफळे, जत | ६५०* |
| ४. | महांकाली स. सा. कारखाना, कवठे महांकाळ | ७१०* |
| ५. | माणगंगा स. सा. कारखाना, आटपाडी | ६३५* |
| ६. | निनाईदेवी स. सा. कारखाना, कोकरूड | ६६६* |
| ७. | राजारामबापू पाटील स. सा. कारखाना, साखराळे | ९५०* |
| ८. | सोनहिरा स. सा. कारखाना, वांगी | ८५०* |
| ९. | तासगांव तालुका स. सा. कारखाना, तुरची | ७५०* |
| १०. | वसंतदादा शेतकरी स. सा. कारखाना, सांगली | ७५०* |
| ११. | विश्वासराव नाईक स. सा. कारखाना, चिखली | ९५७* |
| १२. | यशवंत स. सा. कारखाना, नागेवाडी | ६५०* |
| १३. | क्रांती स. सा. कारखाना, कुंडल (पलूस) | ९००* |
| १४. | सर्वोदय स. सा. कारखाना, कारंदवाडी | ७३७* |
| १५. | मोहनराव शिंदे स. सा. कारखाना, मिरज | ८००* |

(प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर रेकॉर्ड २००३ ते २००८)[१३]

टीप – १) -- : आकडेवारी उपलब्ध नाही. २) * : ॲडव्हान्स हप्ते

या प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ऊस आंदोलनानंतर दर दिले आहेत. यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील उस उत्पादक शेतकऱ्यांवर विविध परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनाचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर झालेला परिणाम :**

दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेने केलेल्या ऊस दराबाबतच्या आंदोलनाचा परिणाम ज्याप्रमाणे शासनावर झाला त्याचप्रमाणे तो ऊस उत्पादक शेतकऱ्यांवरही झाला आहे. ऊस आंदोलनाच्यापूर्वी ७०० ते ८०० रूपये पर्यंत प्रतिटन ऊसास दर मिळत होता. ऊस आंदोलनामुळे हाच ऊस दर वाढून प्रतिटन ९०० ते १२०० रूपये मिळू लागला आहे. म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन १०० ते २०० रूपये पर्यंत ऊसदर वाढवून मिळत आहे.[१४] त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस उत्पादनास प्रेरणा मिळत आहे. तसेच ऊस आंदोलनानंतर काही साखर कारखान्यांनी ऊस बेणे पुरवण्याचे प्रयत्न केले आहेत. निरोगी बेणे पुरवल्यामुळे ऊस उत्पादन वाढण्यास मदत होत आहे. तसेच ऊसाची बिले कारखान्यांकडून वेळेवर शेतकऱ्यांना मिळाली आहेत. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सुटण्यास मदत झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत असल्याचे दिसून येत आहे.

ऊस आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या फायद्याबरोबर तोटेही झाल्याचे दिसून आले. ते म्हणजे काही साखर कारखान्यांनी २००६-०७ च्या गळित हंगामाचे ऊस बिलाचे दुसरे हप्ते अद्यापही दिले नाहीत. तसेच ऊस बेणे, खते, औषधे, लागवड, मशागत, मजूरी यांच्या खर्चामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. तसेच २००६-०७ च्या ऊस गळित हंगामासाठी केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठा मंत्रालयाने ऊसाची किमान वैधानिक किंमत ९% उताऱ्यासाठी ८०२.५० रूपये एवढी निश्चित केली होती. या किंमतीवर उत्तर प्रदेशमध्ये किमान वैधानिक किंमतीपेक्षा प्रतिटन ४४७ रूपये जादा दिले होते. यावरून असे दिसून येते की, दक्षिण महाराष्ट्रात १२ ते १३% ऊस उतारा असतानाही साखर कारखाने प्रतिटन १२०० रूपये दर देत नाहीत. हा तोटा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा सहन करावा लागत आहे. तरिही

शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे गेल्या तीन-चार वर्षात ऊसास दर वाढवून मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक, सामाजिक दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे. या प्रकारे ऊस आंदोलनाचे शेतकऱ्यांवर परिणाम झाले आहेत.

ऊस आंदोलनाबरोबर दक्षिण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दुध बंद आंदोलनही केले होते. या दुध बंद आंदोलनाचे परिणाम शासनावर व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांवरही झाले आहेत.

**शेतकरी संघटनेने केलेल्या दुध बंद आंदोलनाचा शासनावर झालेला परिणाम :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या दुध बंद आंदोलनाचे विविध परिणाम शासनावर झाले आहेत. त्यामध्ये असे म्हणता येईल की, दुध बंद आंदोलनापूर्वी म्हैशीच्या दुधास ६.० फॅटला प्रतिलिटर १३.७० पैसे दर मिळत होता. तर गाईच्या दुधास ३.५ फॅटला प्रतिलिटर ९.७० पैसे दर मिळत होता. हा दुध दर दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना परवडत नव्हता. तो उत्पादन खर्चावर आधारित मिळत नव्हता. त्यासाठी दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी विविध आंदोलने उभारली होती. त्यामध्ये मे २००७ मध्ये दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी दुध बंद आंदोलन केले होते. या दुध बंद आंदोलनाकडे शासनाने प्रथम दुर्लक्ष केले होते. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी निवेदने, तक्रारी शासनासमोर मांडल्या. मात्र शासनाकडून कोणतेच धोरण जाहीर होत नव्हते. त्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलनाची तीव्रता वाढवली होती. १६ ऑक्टोबर २००७ रोजी दुध परिषद झाली होती. तसेच २४ ऑक्टोबर २००७ रोजी दोन दिवसांचे 'दुध बंद आंदोलन' केले होते. याकडे शासनाने दुर्लक्ष केले.[१५] त्यामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी दुध बंद आंदोलन करताना मवाळ मार्ग सोडून हिंसक मार्गाचा वापर केला. हा हिंसक मार्ग जून २००७ च्या दुध बंद आंदोलनात दिसून आला आहे. अशा परिस्थितीत शासनाने दुध उत्पादक शेतकरी व नेते यांच्याशी बैठक घेतली व या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले होते ते निर्णय पुढील प्रमाणे आहेत.

१) दुध दरवाढीबाबत जुलै २००७ पर्यंत निर्णय घेण्यात येईल.

२) १२ जून २००७ पूर्वी दुध संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली जाईल.

३) दुध उत्पादन व दुध वितरण खर्च यातील तफावतींची चौकशी आयुक्तांमार्फत केली जाईल.[१६]

या प्रकारे बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीत तत्कालिन दुग्ध राज्यमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, "दुध उत्पादक व सहकारी दुध संघांशी चर्चा करून मार्ग काढण्यात येईल. दुध आंदोलनामुळे शेतकऱ्यांचेच नुकसान होत आहे. तसेच दुध दरवाढीचा निर्णय त्वरित घेता येणार नाही."[१७] त्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होवून आंदोलन चिघळत गेले. या पार्श्वभूमीवर तत्कालिन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील. आणि दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे नेते यांच्यात बैठक झाली होती. या बैठकीत असा निर्णय झाला होता की, दुध दरवाढी संदर्भात अभ्यासगट नेमून या अभ्यास गटाच्या अहवालानंतर मंत्रीमंडळ निर्णय घेईल. दुध दरवाढी संदर्भातील हा अभ्यास गट शेतकरी संघटना, दुग्ध उत्पादक संघ, महत्त्वाचे खरेदी-विक्री संघ आणि राज्य दुध सघ यांच्याशी चर्चा करून अभ्यासाअंती अहवाल तयार करेल. दोन-तीन आठवड्यांत सर्व बाजूंनी अभ्यास करून अहवाल सादर केला जाईल. आणि दुध दरवाढीचा निर्णय होईल. हा निर्णय घेत असताना दुध उत्पादक व ग्राहक तसेच पशुखाद्यांच्या किंमती, दुध उत्पादन खर्च यांचा प्रामुख्याने विचार केला जाईल. तसेच अभ्यासगटात तज्ज्ञांचा समावेश असेल. हा अभ्यासगट दोन महत्त्वाच्या मुद्यांवर अहवाल तयार करेल. ते म्हणजे दुध दरवाढ लगेच करावी काय? आणि लगेच दुध दरवाढ केली तर किती दरवाढ करावी? यादृष्टीने अभ्यासगट अभ्यास करेल. ग्राहकांना दुध विकत घेण्यासाठी जादा पैसे द्यावे लागू नयेत. या अनुषंगाने अभ्यास केला जाईल. तसेच दुध दराबाबतचे शास्त्रशुद्ध धोरण ठरविण्यासाठी कायमचा अभ्यासगट असावा काय? आणि त्यांनीच दुध दर निश्चित

करावा काय? यासाठी चर्चा करण्यात आली होती.''[१८] शासनाने अशोक बसाक यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमला. या बसाक समितीने सर्व बाजूंनी अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये शिफारशी सुचविण्यात आल्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) शासनाने दुध संकलन व वापर तसेच उपलब्ध सुविधा या यंत्रणांचा पुर्ण कार्यक्षमतेने वापर होण्याच्या दृष्टीने निश्चित धोरणात्मक निर्णय घ्यावा.

२) गाय दुध उत्पादन खर्च उत्पादकाचा १०% नफा गृहीत धरून प्रतिलिटर ११.६४ रूपये एवढा आहे. यासाठी गुणप्रत ही गाईस देण्यात येणारे खाद्य, व्यवस्थापन इत्यादी बाबी विचारात घेवून ३.८ फॅटसाठी ८.५ एस.एन.एफ. साठी आधारभूत आहे.

३) गाय दुधामध्ये म्हैस दुधाची भेसळ टाळण्यासाठी ३.५ फॅट, ८.५ एस.एन.एफ. करिता किमान दर देण्यात येत आहे. तथापी उत्कृष्ठ गुणप्रत असणाऱ्या दुधास प्रतिपॉईट ३० पैसे रक्कम ४.२ फॅट पर्यंत व तद्नंतर २० पैसे वाढ ४.५ फॅट पर्यंत समिती शिफारस करत आहे.

४) म्हैस दुधाचा उत्पादन खर्च दुग्धोत्पादकांचा १०% नफा गृहित धरून प्रतिलिटर रू. १७.३४ एवढा आहे. यासाठी गुणप्रत ही म्हैशीस देण्यात येणारे खाद्य तसेच व्यवस्थापन या बाबी विचारत घेवून ६.५ फॅट, ९.० एस.एन.एफ. साठी आधारभूत आहे.

५) म्हैस दुधातील भेसळ टाळण्यासाठी ६.५ फॅट, ९.० एस.एन.एफ. साठी रू. १७.३४ एवढा दर देण्यात येत असून उत्कृष्ठ गुणप्रतीसाठी प्रती पॉईंट ३० पैसे ७.० फॅट पर्यंत तसेच त्यापूढील प्रत्येक पॉईंटसाठी २० पैसे वाढ ७.५ फॅट पर्यंत सूचवित आहे.[१९]

वरील शिफारशी बसाक समितीने सुचविल्या आहेत. बसाक समितीच्या शिफारशी काही प्रमाणात शासनाने स्विकारल्या आहेत व दुध दर देण्यासाठी दुध संघांना परिपत्रके काढून कळविले आहे. या शासकीय परिपत्रकानुसार दुध संघांनी दुध दर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये गाय दुधासाठी ४.० फॅट, ८.५ एस.एन.एफ. साठी प्रतिलिटर १२.७० पैसे असा दर दिला आहे. तर म्हैस दुधासाठी ७.० फॅट, ९.० एस.एन.एफ. साठी १७.९० पैसे प्रतिलिटर हा दुध दर दिला आहे. या प्रकारे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या दुध बंद आंदोलनाचा परिणाम शासनावर झाला असल्याचे दिसून येते.

**दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या दुध बंद आंदोलनाचा शेतकऱ्यांवर झालेला परिणाम :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या दुध बंद आंदोलनाचे शेतकऱ्यांवर विविध परिणाम झाले आहेत. शासनाने २६ मे २००७ रोजीच्या 'दुध बंद आंदोलनाचा' विचार करून गाईच्या व म्हैशीच्या दुध दरात प्रतिलिटर १ रूपयाने दर वाढ केली होती. हा वाढीव दुध दर दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना मिळत आहे. तसेच शासनाने नेमलेल्या बसाक समितीने दुध दरवाढ सुचविली होती ती मान्य करून समितीच्या शिफारशी वरून दुध संघांनी दर वाढ देण्यास परिपत्रके काढली. त्यामुळे दरवाढीनुसार दुध उत्पादक संघ दुध दर देत आहेत. त्यामुळे म्हैस दुधास २.२० पैसे वाढ आणि गाईच्या दुधास १.५० पैसे दरवाढ मिळत आहे. या दुध दरवाढीमूळे प्रत्येक दिवशी ३ कोटी रूपयांचा दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना फायदा मिळत आहे. तसेच वर्षामध्ये १३०० कोटीहून अधिक रूपयांचा फायदा दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचा झाला आहे. तसेच दुध दर वाढले असल्यामुळे जरी शेतकऱ्यांचे फायदे झाले असले तरी काही तोटे झाले आहेत. त्यामध्ये ओला चारा, कडबा, पशुखाद्यांचे दर वाढले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे. तसेच दुध संघाकडून जनावरांना

करण्यात येणाऱ्या लसीकरणाचे, औषधउपचाराचे दर वाढले आहेत. असे असले तरीही दुध दरवाढीमुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत होत आहे. त्यामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न सुटण्यास आंदोलनामुळे मदत झाली आहे. परिणामी दुध उत्पादक शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा, राहणीमानाचा दर्जा आणि सामाजिक दर्जा सुधारत आहे.

अशा प्रकारे दक्षिग महाराष्ट्रातील ऊस उत्पादक व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी विविध आंदोलने केली व या यशस्वी आंदोलनाचा परिणाम शासनावर झाला. या आंदोलनातून ऊसाला ९% उताऱ्यास प्रतिटन ९०० रूपये व ९% उताऱ्यापासून पूढील प्रत्येक टनास ९० रूपये दर देण्यास सहकारी साखर कारखान्यास शासनाने आदेश दिले. परंतु या निर्णयावर शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते. कारण शेतकऱ्यांची मुळ मागणी ऊस उत्पादन खर्चाचा विचार करून ऊसास दर मिळावा. म्हणजेच १५०० ते १६०० रूपये प्रतिटन दर मिळावा ही आहे. परंतु शासनाचे व सहकारी साखर कारखानदारांचे या मागणीकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकरी परराज्यात ऊस पाठवण्यास तयार झाले. तसेच दुध उत्पादक शेतकऱ्यांनी म्हैशीच्या प्रतिलिटर दुधास १८ रूपये व गाईच्या प्रतिलिटर दुधास १४ रूपये दर देण्याची मागणी शासनासमोर केलेली दिसून येते. दुध उत्पादकांच्या या मागणीवर शासनाने बसाक समिती नेमली व या समितीने म्हैशीच्या दुधास ६.५ फॅट, ९.० एस.एन.एफ. साठी १७.३४ पैसे व गाईच्या दुधास ३.५ फॅट, ८.५ एस.एन.एफ. साठी ११.३४ पैसे दर देण्याचे या समितीने सुचविले. परंतू दुध उत्पादक शेतकऱ्यांची मूळ मागणी 'उत्पादन खर्चावर आधारित दर' ही मागे पडल्याचे दिसून येते व यातूनच शासन व शेतकरी संघटना यांच्यामध्ये ऊसदर व दुधदर यासाठी संघर्ष झाल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, १ मे २००७, पृष्ठ क्र. १.

२) उपरोक्त – ३ मे २००७, पृष्ठ क्र. १.

३) उपरोक्त – पृष्ठ क्र. १.

४) उपरोक्त – आपलं कोल्हापूर, ५ जुलै २००७, पृष्ठ क्र. ४.

५) दैनिक लोकसत्ता, ४ ऑक्टोबर २००७, पृष्ठ क्र. ८.

६) दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, २९ जून २००७, पृष्ठ क्र. ७

७) उपरोक्त – ६ नोव्हेंबर २००८, पृष्ठ क्र. ३.

८) उपरोक्त – पृष्ठ क्र. ३.

९) दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, १३ फेब्रुवारी २००८, पृष्ठ क्र. १.

१०) दैनिक पुढारी, आपलं कोल्हापूर, २२ फेब्रुवारी २००८, पृष्ठ क्र. १.

११) दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती, ४ नोव्हेंबर २००८, पृष्ठ क्र. १.

१२) प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, रेकॉर्ड २००३ ते २००८.

१३) उपरोक्त

१४) दैनिक पुढारी, आपलं कोल्हापूर, ५ जुलै २००७, पृष्ठ क्र. ४.

१५) दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती, २६ मे २००७, पृष्ठ क्र. १.

१६) उपरोक्त – २६ मे २००७, पृ. क्र. १.

१७) उपरोक्त – २६ मे २००७, पृ. क्र. १.

१८) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ जुलै २००७, पृष्ठ क्र. १६.

१९) अशोक बसाक समिती अहवाल, (महाराष्ट्र शासन), १६ जुलै २००७.